# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

<u>परीपत्रक क्रमांक</u> - ७१

जा.क्र. झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/२००४
गृहनिर्माण भवन, ५ वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दिनांक - ०१.०१.२००४

## परिपत्रक

असे निदर्शनास आले आहे की, बहुवंशी झोपडपट्टी पुनर्वसन सहकारी संस्था त्यांच्या सभासदांना संस्थेच्या चालू असलेल्या गतीविधीविषयी यांग्य ती माहिती देत नाहीत. तसेच संस्थेच्या सभासदांना पुनर्वसनाचा एकंदरीत आराखडा परिशिष्ट - २ व सभासदांना पुरविण्यात येणा-या संक्रमण शिबिराची अधिकृतपणे माहिती पुरवली जात नाही असेही निदर्शनास आलेले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या योजनेच्या बाबतीत सभासद व नागरीकांना पूर्ण माहिती व पारदर्शकता असणे आवश्यक आहे..

वरील सर्व बार्बीचा सारासार विचार करून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांची दर तीन महिन्यातून एकदा विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यात यावी.

२). या सभेस खास आमंत्रित म्हणून कार्यकारी अभियंता/झोपुप्रा / त्यांचे प्रतिनिधी , सहाय्यक निबंधक सहकारी संस्था/त्यांचे प्रतिनिधी, उपजिल्हाधिकारी / झोपुप्रा/ त्यांचे प्रतिनिधी, विकासक/वास्तुविशारद यांना आमंत्रित करण्यात यावे.

३) सदरील सभेमध्ये प्रस्तावित योजनेची सर्व माहिती सर्व सभासदांना पुरविणे संस्थेस/ विकासकास बंधनकारक राहील.

४) सभेच्या स्थळी परिशिष्ट -२, पुनर्वसनाच्या योजनेचा आराखडा व इतर संबंधित कागदपत्रे सभासदांच्या निरीक्षणासाठी हजर ठेवावीत.

५) कार्यान्वित योजनेच्या आराखडयातून काही बदल करावयाचे असल्यास सदर खास सभेची मंजूरी आवश्यक राहील. सदर दुरूस्ती बाबतचा ठराव खास सभेने मंजूर केल्यानंतरच प्राधिकरणामार्फत पुढील मंजूरी प्रदानाची कारवाई करण्यात येईल.

६) सभेमध्ये उपस्थित होणा-या शंकेचे निरसन येथेच संबंधित अधिकारी/विकासक संस्था यांनी करावे. याबाबत वरीष्ठ पातळीवरून मार्गदर्शन /कार्यवाहीची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

७) सदरील सभेचे इतीवृत्त संबधति सहकारी संस्थेच्या सचिवांनी ठेवावे व त्याच्या प्रती मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अवलोकनार्थ सादर कराव्यात.

A:\Paripatrak.doc

८) माहे. जानेवारी २००४ ते माहे. मार्च २००४ या कालावधीतील सर्व सहकारी संस्थांची (ज्यांचे पुनर्वसन प्रस्ताव कार्यान्वित आहेत) विशेष सभा सर्व संबंधितांनी मार्च २००४ पूर्वी घेऊन कार्यपूर्तीचा अहवाल सादर करावा.

९) सदर परिपत्रकाचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे. सदरील परिपत्रकाचे पालन न केल्यास संबंधित संस्था/कर्मचारी तसेच विकासका विरूध्द नियमानुसार कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

A:\Paripatrak.doc